ePaper
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज ™
WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार, दि. 19 मार्च 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

# चीनकडे निघालेले रशियन तेलवाहू जहाज भारताकडे वळले!







मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर भीषण अपघात!

### शिवालिक, नंदादेवीनंतर तिसरे जहाज मुंद्रा बंदरावर; ८१ हजार मुरबन कच्चे तेल भारतात

# ‘जग लाडकी’ जहाज भारतात दाखल; स्ट्रेट होर्मुझमधून धाडसी प्रवास...

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**शिवालिक, नंदादेवीनंतर आता 'जग लाडकी' जहाजही भारतीय किनारपट्टीवर पोहचले आहे. स्ट्रेट होर्मुझ या धोकादायक सामुद्रधुनीतून प्रवास करत हे जहाज कच्चे तेल घेऊन गुजरातच्या मुंद्रा पोर्टला दाखल झाले आहे. आज सकाळी १०.३० वाजता मुंद्रा पोर्टच्या बाह्य सागरी क्षेत्र SPM येथे जग लाडकी जहाज पोहचले. हे खोल समुद्रातील ठिकाण असून तिथून मोठ्या जहाजातून तेल बाहेर काढले जाते. टँकर त्याच्या नियोजित ठिकाणी पोहोचल्यानंतर येथे तैनात असलेल्या तांत्रिक पथकांनी त्यांची सुरक्षा तपासणी पूर्ण केली. यानंतर नियमानुसार समुद्रातील हस्तांतरण पार पाडण्यात आले.**




## धोकादायक मार्गावरून यशस्वी प्रवास

मध्य पूर्वेतील तणावपूर्ण परिस्थितीत स्ट्रेट होर्मुझमधून मार्ग काढत 'जग लाडकी' जहाज भारतात दाखल झाले. या जहाजासह अडकलेल्या भारतीय जहाजांची सुटका होत असून, कच्च्या तेलाचा पुरवठा पुन्हा सुरळीत होण्यास मदत होत आहे.

## समुद्री संकटातून सुटका...

मध्य पूर्वेतील वाढत्या तणावामुळे स्ट्रेट होर्मुझ या महत्त्वाच्या सामुद्रधुनीत अनेक जहाजे अडकून पडली होती. या पार्श्वभूमीवर ‘जग लाडकी’ हे भारतीय ध्वजधारक जहाज धोकादायक मार्ग पार करत सुरक्षितपणे भारतात दाखल झाले आहे. याआधी ‘शिवालिक’ आणि ‘नंदादेवी’ ही जहाजेही यशस्वीपणे भारतात पोहोचली होती. ‘जग लाडकी’ या जहाजातून सुमारे ८१ हजार मुरबन कच्चे तेल गुजरातमधील मुंद्रा बंदरावर आणण्यात आले असून, या घटनेमुळे देशाच्या इंधन पुरवठ्यास मोठा दिलासा मिळाला आहे. युद्धजन्य परिस्थितीतही भारतीय जहाजांनी सुरक्षित मार्ग काढत परत येणे ही महत्त्वाची बाब मानली जात आहे. तसेच, उर्वरित अडकलेल्या जहाजांच्या सुटकेसाठी प्रयत्न सुरू असल्याचेही समजते.

भारत सरकारच्या शिपिंग मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी राजेश कुमार सिन्हा म्हणाले की, भारतीय तिरंगा ध्वज असलेले जग लाडकी जहाज १४ मार्चला संयुक्त अरब अमीरात येथून निघाले होते. या जहाजातून जवळपास ८१ हजार मुरबन कच्चे तेल भारतात आणले गेले. याआधी भारतीय ध्वज असणारे एलपीजी जहाज शिवालिक, नंदादेवी हेदेखील स्ट्रेट होर्मुझमधून प्रवास करत भारतात पोहचले आहेत. शिवालिक १६ मार्च रोजी गुजरातच्या मुंद्रा बंदरावर दाखल झाले. नंदादेवी जहाज १७ मार्च रोजी कांडला पोर्टवर पोहचले. या दोन जहाजातून जवळपास ९२ हजार ७१२ टन एलपीजी भारतात पोहचले आहे.

शिवालिक, नंदादेवी आणि जग लाडकी ही जहाजे त्या २२ जहाजांमधील आहेत जे युद्ध काळात स्ट्रेट होर्मुझ बंद झाल्याने पश्चिमी भागात अडकली होती. अमेरिका, इस्रायल यांनी इराणवर हल्ला केला. त्यानंतर मध्य पूर्वेत तणावाची स्थिती निर्माण झाली. इराणने या हल्ल्यानंतर स्ट्रेट होर्मुझमधील सागरी वाहतूक रोखून धरली. त्यामुळे अनेक तेल वाहतूक करणारी जहाजे अडकली. त्यामुळे अनेक देशांमध्ये तेल, इंधन तुटवडा निर्माण झाला. ट्रम्प यांनी अनेक देशांना स्ट्रेट होर्मुझमधून सुरक्षित बाहेर काढू असं आश्वासित केले परंतु त्यांना यश आले नाही. दुसरीकडे भारताला इराणशी चांगल्या संबंधांचा फायदा झाला. अनेक भारतीय जहाजे सुरक्षितपणे या सागरी मार्गातून भारतात परतली आहेत.

दरम्यान, एकूण २२ भारतीय ध्वजधारक जहाजे स्ट्रेट होर्मुझमध्ये अडकली असून त्यापैकी ६ LPG कॅरियर्स, १ LNG टँकर, ४ क्रूड ऑइल टँकर्स आणि केमिकल कंटेनर जहाजांचाही समावेश आहे. यातील एका मोठ्या LPG जहाजामध्ये सुमारे ४५००० मेट्रिक टन गॅस वाहून नेला जाऊ शकते. त्यामुळे ६ जहाजांमध्ये मिळून अंदाजे ३ लाख मेट्रिक टन LPG आहे. दोन भारतीय LPG टँकर्स ‘शिवालिक’ आणि ‘नंदादेवी’ यांनी सुरक्षितपणे होर्मुझ पार करत भारतात पोहचले आहे. त्यानंतर आता जग लाडकी हे तिसरे जहाजही भारतात दाखल झाले आहे.

# मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर भीषण अपघात!

## ब्रेक निकामी झालेल्या कंटेनरचा ताबा सुटला; ४ जण जखमी

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर खोपोली हद्दीत नवीन बोगद्याजवळ बुधवारी (ता. १८) सकाळी सुमारे साडेनऊ वाजण्याच्या सुमारास पाच वाहनांचा भीषण अपघात झाला. या अपघातात कारमधील तिघांचा जागीच मृत्यू झाला असून चार जण किरकोळ जखमी झाले आहेत.**






### अपघाताची थरारक घटना

खोपोलीजवळील उतारावर भरधाव कंटेनरचे ब्रेक निकामी झाल्याने पाच वाहनांची भीषण साखळी धडक झाली. कंटेनर थेट कारवर उलटल्याने तिघांचा जागीच मृत्यू झाला, तर चार जण जखमी झाले असून तातडीने बचावकार्य राबवून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, आडोशी बोगदा पार केल्यानंतर खोपोली एक्झिटजवळील तीव्र उतारावर पुण्याहून मुंबईकडे जाणाऱ्या भरधाव कंटेनरचे ब्रेक निकामी झाले. नियंत्रण सुटलेल्या कंटेनरने पुढे असलेल्या तीन कार आणि एका बल्करला जोरदार धडक दिली.

धडकेनंतर कंटेनर एका कारवर उलटल्याने त्या कारमधील तिघांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात कंटेनर चालक अवधेश यादव (रा. नवी मुंबई रेल्वे यार्ड) जखमी झाला असून त्याला ताब्यात घेण्यात आले आहे. अन्य जखमींमध्ये भानुदास गायकवाड, अक्षय महादु गायकवाड, स्वप्नील (पूर्ण नाव समजले नाही) यांचा समावेश आहे. जखमींवर खोपोली येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती मिळताच आयआरबी कर्मचारी, 'देवदूत' यंत्रणा, बोरघाट महामार्ग वाहतूक पोलीस, खोपोली पोलीस ठाण्याचे पथक, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बल, हेल्प फाऊंडेशनचे कार्यकर्ते तातडीने घटनास्थळी दाखल झाले. बचावकार्य तातडीने राबवून जखमींना बाहेर काढण्यात आले.

या अपघातामुळे मुंबईकडे जाणारी वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. अपघातग्रस्त वाहने क्रेनच्या सहाय्याने बाजूला केल्यानंतर वाहतूक हळूहळू सुरळीत करण्यात आली. दरम्यान, अपघाताचे नेमके कारण व पुढील तपास खोपोली पोलीस करत आहेत.



# कोथरुड, बाणेर भागात ढगांचा गडगडाट...

**महाईन्यूज । पुणे**

पुणे शहर आणि परिसरात बुधवारी (दि. १८) सायंकाळी चारच्या सुमारास हलक्या स्वरूपाच्या पावसाला सुरुवात झाली. कोथरूड, शिवाजीनगर, औंध, बाणेर या भागांमध्ये ढगांचा गडगडाट होत असून रिमझिम पावसाने वातावरण गारठले आहे. दिवसभर उकाड्यानंतर अचानक झालेल्या या बदलामुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

दरम्यान, हवामान विभागाने राज्यात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवून सतर्कतेचा 'यलो अलर्ट' जारी केला आहे. पुण्यासह रायगड, रत्नागिरी, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, तसेच मराठवाड्यातील बीड, धाराशिव, लातूर, परभणी, हिंगोली, नांदेड आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांत ताशी ३० ते ५० किमी वेगाने वारे, मेघगर्जना आणि विजांसह पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

मंगळवारी रात्री पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने हजेरी लावली. काही भागात गारपीटही झाली. सोलापूर, अक्कलकोट परिसरात पाऊस झाला, तर सांगली आणि मिरजमध्ये गारांसह जोरदार सरी कोसळल्या. हवामान विभागाने पुढील काही तास नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन केले असून विजांच्या कडकडाटाच्या वेळी सुरक्षित ठिकाणी थांबण्याचा सल्ला दिला आहे.

# यलो अलर्ट जारी..! राज्यात पुढील दोन दिवस धोकादायक हवामानाची शक्यता

**महाईन्यूज । पुणे**

**हवामान विभागाकडून राज्यातील अनेक भागांसाठी इशारा देण्यात आला असून, पुढील दोन दिवस वातावरण अस्थिर राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागातील अधिकारी एस. डी. सानप यांनी दिलेल्या माहितीनुसार, दक्षिण मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.**




सानप यांनी दिलेल्या माहितीनुसार, विदर्भातील चंद्रपूर, गोंदिया आणि आसपासच्या जिल्ह्यांना या बदलत्या हवामानाचा फटका बसण्याची शक्यता आहे. या कालावधीत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसासोबतच सोसाट्याचा वारा, गारपीट आणि विजेचा कडकडाट होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. त्यामुळे शेतकरी आणि नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मागील २४ तासांत धाराशिव आणि विदर्भातील काही भागांत गारपीट झाल्याचे पाहायला मिळाले आहे. तर काही ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाने हजेरी लावली. या अचानक बदललेल्या हवामानामुळे पिकांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, ही परिस्थिती २० मार्चपर्यंत कायम राहण्याची शक्यता आहे. त्यानंतर मात्र वातावरणात सुधारणा होऊन आकाश निरभ्र राहील आणि तापमानातही स्थिरता येईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये भटक्या कुत्र्यांसाठी 8 अधिकारी नियुक्त

## तक्रारींच्या जलद निपटाऱ्यासाठी क्षेत्रीय कार्यालयनिहाय यंत्रणा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड शहरात मोकाट व भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. तसेच, कुत्र्यांच्या हल्ल्यात अनेक नागरिक जखमी झाले आहेत. ते प्रकार सातत्याने वाढत आहेत. त्या संदर्भात नागरिकांच्या तक्रारी ऐकण्यासाठी महापालिकेने क्षेत्रीय कार्यालयनिहाय स्वतंत्र आठ अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे. त्यांना संपर्क साधल्यास तात्काळ कारवाई करण्यात येईल, असा दावा महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाने केला आहे.**



मोकाट कुत्री व त्यांच्या हल्ल्याबाबतच्या तक्रारींचे निवारण प्रामुख्याने केंद्रस्तरावरून होत असल्याने कार्यवाहीस वेळ लागत होता. अधिकारी नागरिकांसह नगरसेवकांचे फोन उचलत नव्हते. त्यामुळे पशुवैद्यकीय विभागावर रोष व्यक्त केला जात होता. आता, ती कार्यवाही महापालिकेच्या आठ क्षेत्रीय कार्यालयस्तरावर होणार आहे. त्यासाठी स्वतंत्र अधिकारी नेमण्यात आला आहे. संबंधित नागरिकांनी क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीनुसार संबंधित अधिकार्यांकडे तक्रार करावी. महापालिकेमार्फत ही सर्व कामे भारतीय प्राणी कल्याण मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार करण्यात येणार आहेत.

### तक्रारींचा जलद निपटारा

शहरातील नागरिकांना मोकाट कुत्र्यांच्या त्रासासंदर्भात तक्रारी मांडण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयस्तरावरच सक्षम यंत्रणा उभी केली जात आहे. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयासाठी स्वतंत्र समन्वय अधिकार्यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यामुळे तक्रारींचे निवारण जलद गतीने होईल, असा दावा महापौर रवी लांडगे यांनी केला आहे.



# भोसरीत गॅस सिलिंडर टंचाई; चुलीवर स्वयंपाकाची वेळ

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

गॅस सिलिंडरच्या टंचाईमुळे शहरातील नागरिक प्रचंड त्रस्त आहेत. वेळेत सिलिंडर मिळत नसल्याने गृहणी मेटाकुटीला आल्या असून दैनंदिन स्वयंपाकाचे नियोजन कोलमडले आहे. अनेक ठिकाणी नागरिकांनी घरासमोर चुली उभारून लाकडे जाळून स्वयंपाक करण्यास सुरुवात केली आहे. आधुनिक सुविधांमध्ये राहणाऱ्या कुटुंबांना पुन्हा पारंपरिक पद्धतीचा आधार घ्यावा लागत असल्याचे चित्र भोसरी परिसरात दिसून येत आहे.

भोसरी परिसरात सिलिंडर टंचाईमुळे नागरिक हैराण आहेत. त्यात भर की काय गॅस बुकिंग केल्यानंतरही सिलिंडर वेळेत मिळत नसल्याने नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. ताबडतोब मिळणारे सिलिंडरसाठी प्रतीक्षा करावी लागत असल्याने महिलांचे वेळापत्रक कोलमडले आहे. अनेक ठिकाणी रोजच्या जेवणाची मोठी अडचण निर्माण झाली आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक यांची गैरसोय होत असून आरोग्यावरही त्याचा परिणाम होत असल्याची तक्रार नागरिक करत आहेत.

# पिंपरी-चिंचवडमध्ये शेअर ट्रेडिंग फसवणूक; ‘चीन कनेक्शन’ उघड

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शेअर ट्रेडिंगच्या आमिषाने लाखोंची फसवणूक करणाऱ्या आंतरराष्ट्रीय सायबर रॅकेटचा पर्दाफाश पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांनी केला. लोणावळा येथील एका आलिशान व्हिलावर छापा टाकून चार जणांना अटक करण्यात आली असून, या प्रकरणाचे थेट ‘चीन कनेक्शन’ उघड झाले आहे.**



मोनिल अतुलकुमार मोदी (24, रा. मेहसाणा, गुजरात), रवि गोकल प्रसाद जाट (21, रा. राजगड, मध्यप्रदेश), रुद्रपाल सिंग गजेंद्रसिंग चौहान (22, रा. खंडवा, मध्यप्रदेश) आणि हंश कैलास वर्मा (19, रा. बोरीवली, मुंबई) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

पिंपरी-चिंचवडमधील एका नागरिकाची शेअर ट्रेडिंगमध्ये गुंतवणुकीचे आमिष दाखवून 97 लाख 70 हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास करताना सायबर पोलिसांना मोठ्या रॅकेटचा सुगावा लागला. फसवणुकीतील 8.25 लाख रुपये मोनिल मोदीच्या खात्यावर जमा झाल्याचे निष्पन्न झाले.

मोदी हा सतत ठिकाण बदलत असल्याने पोलिसांना मिळत नव्हता. दरम्यान, तो लोणावळ्यातील एका व्हिलामध्ये येणार असल्याची माहिती सहायक पोलिस निरीक्षक प्रविण स्वामी यांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून सुमारे 500 व्हिलामधून आरोपीचा शोध घेत त्याला ताब्यात घेतले. त्याचवेळी व्हिलामध्ये उपस्थित असलेल्या इतर तिघांनाही अटक करण्यात आली. चौघांकडून एक लॅपटॉप, सात मोबाईल, 14 डेबिट कार्ड, दोन वेबकॅमेरे, पाच बँक अकाउंट किट आणि एक रबरी स्टॅम्प असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी वेबकॅमेऱ्याच्या निगराणीत बसून विविध बँक खात्यांतील रक्कम एकत्र करत होते. मोनिल मोदी याच्याकडे नऊ बँकांची करंट खाती असून, त्यातून एक कोटी रुपयांहून अधिक रक्कम जमा केल्याचे समोर आले आहे. रवी जाट आणि रुद्रपाल चौहान हे पैसे पुढील खात्यांमध्ये वर्ग करत होते, तर हंश वर्मा त्यांच्यावर देखरेख ठेवत होता. या चौघांवर हाँगकाँगमधील अज्ञात सूत्रधारांकडून नियंत्रण ठेवले जात होते. फसवणुकीची रक्कम ‘यूएसडीटी’ (क्रिप्टो करन्सी)मध्ये रूपांतरित करून परदेशात पाठवली जात होती. बदल्यात मोनिल मोदी याला एक टक्का कमिशन, तर इतरांना यूएसडीटीमध्ये पगार दिला जात होता. ‘किंग पेमेंट ग्लोबल’ या कंपनीत नोकरी दिल्याचे बनावट पत्र आणि ओळखपत्रही आरोपींना देण्यात आले होते. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, आंतरराष्ट्रीय सायबर गुन्हेगारी साखळी समोर येण्याची शक्यता आहे. ही कारवाई पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे, सह आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अतिरिक्त आयुक्त सारंग आव्हाड, उपायुक्त डॉ. शिवाजी पवार, सहायक आयुक्त डॉ. विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक रविकिरण नाळे, सहायक निरीक्षक प्रविण स्वामी यांच्या पथकाने केली.

### सायबर फसवणुकीचा पर्दाफाश

पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांनी लोणावळ्यातील आलिशान व्हिलावर छापा टाकून शेअर ट्रेडिंगच्या आमिषाने लाखोंची फसवणूक करणाऱ्या आंतरराष्ट्रीय रॅकेटचा भांडाफोड केला. चौघांना अटक करून लॅपटॉप, मोबाईल, डेबिट कार्डसह विविध साहित्य जप्त करण्यात आले असून, फसवणुकीची रक्कम क्रिप्टोकरन्सीद्वारे परदेशात पाठवली जात असल्याचे उघड झाले आहे.

# कधी संपणार हा संघर्ष?



## भूमिका

**महाराष्ट्र राज्यात पर्यावरण संरक्षण, आर्थिक शिस्त आणि औद्योगिक विकास यांचा समतोल राखण्याचा प्रयत्न म्हणून महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) विधेयक, 2026 एकमताने मंजूर होणे हा नक्कीच महत्त्वाचा टप्पा मानावा लागेल. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मांडलेले हे विधेयक केवळ कर वाढवण्यापुरते मर्यादित नसून, दीर्घकालीन पर्यावरणीय आणि आर्थिक दृष्टीकोनातून राज्याची दिशा ठरवणारे आहे.**

सर्वप्रथम, या विधेयकाचा गाभा म्हणजे वाढत्या वायू प्रदूषणावर नियंत्रण. राज्यातील शहरी भागांमध्ये, विशेषतः मुंबई-पुणे-नाशिक या औद्योगिक पट्ट्यात, प्रदूषणाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. जुन्या आणि प्रदूषणकारी वाहनांची संख्या मोठी असल्याने हवा गुणवत्तेवर त्याचा थेट परिणाम होतो. अशा परिस्थितीत पर्यावरण करात वाढ करणे हा एक कठोर पण आवश्यक निर्णय आहे. दुचाकी, पेट्रोल आणि डिझेल वाहनांवरील कर दुप्पट करण्याचा निर्णय हा वाहनधारकांसाठी आर्थिकदृष्ट्या जरी भारदस्त वाटत असला, तरी त्यामागील व्यापक उद्दिष्ट दुर्लक्षित करता येणार नाही.



तथापि, या निर्णयाचे सामाजिक परिणामही तपासणे गरजेचे आहे. मध्यमवर्गीय आणि ग्रामीण भागातील नागरिक अनेकदा आर्थिक कारणांमुळे जुन्या वाहनांवर अवलंबून असतात. त्यांच्यासाठी हा वाढीव कर अतिरिक्त आर्थिक ताण निर्माण करू शकतो. त्यामुळे शासनाने कर वाढीबरोबरच पर्यायी उपाययोजना—जसे की वाहन बदलण्यासाठी अनुदान, सुलभ कर्ज योजना किंवा स्क्रॅपेज पॉलिसी अधिक प्रभावीपणे राबवणे—यावरही भर देणे आवश्यक ठरेल.

या विधेयकाचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे इलेक्ट्रिक आणि बीएस-6 वाहनांना प्रोत्साहन. पर्यावरणपूरक वाहनांचा स्वीकार वाढवण्यासाठी आर्थिक दडपण आणि प्रोत्साहन या दोन्ही गोष्टींचा समन्वय महत्त्वाचा असतो. कर वाढीमुळे जुनी वाहने ठेवणे महागडे होईल आणि त्यामुळे नागरिक नवीन, स्वच्छ तंत्रज्ञानाकडे वळतील, अशी अपेक्षा आहे. मात्र, इलेक्ट्रिक वाहनांची किंमत, चार्जिंग पायाभूत सुविधा आणि ग्रामीण भागातील उपलब्धता यासारख्या अडचणी अजूनही मोठ्या प्रमाणावर आहेत. त्यामुळे केवळ कर वाढवून अपेक्षित बदल घडेल का, हा प्रश्न उपस्थित राहतो.

या विधेयकामुळे दरवर्षी सुमारे 160 कोटी रुपयांचा अतिरिक्त महसूल मिळणार असल्याचे सांगितले गेले आहे. हा निधी रस्ता सुरक्षा, आधुनिक परिवहन सुविधा आणि प्रशिक्षणासाठी वापरण्याचा सरकारचा मानस आहे. ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. कारण भारतात, आणि विशेषतः महाराष्ट्रात, रस्ते अपघातांची संख्या चिंताजनक आहे. जर हा निधी पारदर्शक आणि परिणामकारक पद्धतीने वापरला गेला, तर त्याचे दूरगामी सकारात्मक परिणाम दिसून येऊ शकतात.

राज्याच्या एकत्रित निधीवर कोणताही अतिरिक्त भार पडणार नाही, उलट महसूल वाढेल, ही बाब सरकारसाठी नक्कीच सकारात्मक आहे. परंतु, महसूल वाढ हा अंतिम उद्देश नसून तो साधन आहे. त्या निधीचा वापर कसा आणि किती परिणामकारकपणे केला जातो, यावरच या विधेयकाचे खरे यश अवलंबून असेल.

एकमताने मंजुरी मिळाल्यामुळे या विधेयकाला राजकीय पाठबळ मिळाले आहे, हेही विशेष उल्लेखनीय आहे. सहसा कर वाढीच्या निर्णयांवर राजकीय मतभेद दिसून येतात, मात्र या वेळी सर्व पक्षांनी एकत्र येत पर्यावरण आणि विकासाच्या मुद्द्यावर सहमती दर्शवली आहे. हे राज्याच्या धोरणात्मक परिपक्वतेचे लक्षण मानता येईल.

एकंदरीत, महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) विधेयक, 2026 हे पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे. मात्र, यशस्वी अंमलबजावणीसाठी पूरक धोरणे, सामाजिक संवेदनशीलता आणि पारदर्शक प्रशासन यांची जोड आवश्यक आहे. अन्यथा, कर वाढ ही केवळ आर्थिक बोजा ठरू शकते. योग्य अंमलबजावणी झाली, तर हा निर्णय राज्याच्या शाश्वत विकासासाठी खरोखरच एक मैलाचा दगड ठरू शकतो.

---

## प्रासंगिक »

### हरवलेला आत्मविश्वास

***एकदा एक मुंगी आपले खाद्य शोधत असताना कोशातून बाहेर पडत असलेल्या किड्याला पाहते. ते पाय हालवत होते.***

मुंगी म्हणाली, “अरेरे, तुझ्या स्थितीत मी कधीच नसणार; मला वाटते तिकडे फिरता येतं, पण तुला कोशात बंदिवान होऊन दिवस घालवावे लागतात.” किडा काहीही न बोलता राहिला. काही दिवसांनी मुंगी परत गेली, तेथे फक्त किड्याचे कवच पडलेले होते, तर तो स्वतः सुंदर पतंग बनून आकाशात उडत होता. त्याने म्हणाले, “त्या दिवशी तू माझ्यावर हसत होतीस; तोच कोशातला किडा मी आहे. आपल्या स्थितीवर खुशाल गर्व करायची असेल, तर कर; पण मी थोडा आकाशात फिरून येतो.”किड्याचे रूप बदलून पतंग होणे हे संघर्षाचा आणि बदलाचा प्रतीक आहे. मुंगीला समजले की प्रतिकूल परिस्थितीत असलेल्या कोणावर हसणे योग्य नाही. वेळ आणि प्रयत्नाने कोणतीही परिस्थिती उलटू शकते. संकटात असलेला माणूस पुन्हा सामर्थ्यवान बनू शकतो. त्यामुळे इतरांच्या हालावरून गर्व करण्यापेक्षा आपले कृत्य आणि संयम महत्त्वाचे ठरते.

**तात्पर्य-** संकटात असलेल्या व्यक्तीवर त्याची परिस्थिती पाहून हसणे आणि स्वतःची बढाई मारणे मूर्खपणा आहे; वेळ आली की तो पूर्वीच्या अवस्थेपेक्षा खूप वर जाऊ शकतो.

---

नाशिकमधील बहुचर्चित अशोक खरात प्रकरण हे फक्त एका व्यक्तीच्या कृत्याचे नावीन्यपूर्ण प्रकरण नाही, तर समाजातील अंधश्रद्धा, विश्वास आणि महिला सुरक्षिततेवर गंभीर प्रश्न उपस्थित करणारे प्रकरण ठरले आहे.

# अंधश्रद्धा, सत्ता आणि सामाजिक जबाबदारी!

खरात, जो स्वतःला आध्यात्मिक मार्गदर्शक व ज्योतिषी म्हणून सादर करत असे, त्याने धार्मिक विधीच्या नावाखाली महिलांशी केलेल्या अत्याचाराचे व्हिडीओ समोर आले आहेत. गुंगीचे औषध देऊन महिलांवर बलात्कार केल्याचा आरोप पोलिसांनी नोंदवला असून, त्याला सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

या घटनेत सर्वात चिंताजनक बाब म्हणजे लोकांचा अंधविश्वास आणि धार्मिक विधीचा गैरफायदा. अनेक सामान्य नागरिक तसेच राजकीय नेते, अधिकारी आणि सेलिब्रिटी त्याच्या कार्यालयात मार्गदर्शनासाठी येत होते. पोलिस तपासात असे व्हिडीओही जप्त झाले आहेत, जे या प्रकरणाची गंभीरता सिद्ध करतात. धार्मिक विश्वासाचा गैरवापर करून लोकांचा फसवणूक करणे ही सामाजिकदृष्ट्या गंभीर समस्या आहे. यावरून स्पष्ट होते की अंधश्रद्धेवर नियंत्रण न ठेवले, तर धर्माच्या नावाखाली शोषण घडण्याची शक्यता कायम राहते.

राजकीय स्तरावरही या प्रकरणाने खळबळ उडवली आहे. सिन्नर



तालुक्यातील ‘श्री शिवनिका संस्थान’ या मंदिराचे विश्वस्त मंडळ आणि महिला आयोगाशी संबंध, तसेच माजी मुख्यमंत्री यांची भेट यामुळे प्रकरण आणखी संवेदनशील झाले आहे. यामुळे सत्ताधाऱ्यांची नैतिक जबाबदारी देखील प्रश्नाच्या चौकटीत आली आहे. विरोधकांनी महिला आयोग आणि संबंधित अधिकाऱ्यांवर टीका करत, धार्मिक संस्थांचा गैरवापर आणि लोकशाही मूलभूत हक्कांचे उल्लंघन रोखण्यासाठी कडक कारवाईची मागणी केली आहे.

समाजाच्या दृष्टीने हे प्रकरण महिला सुरक्षिततेसाठी, अंधश्रद्धा निर्मूलनासाठी आणि कायद्याच्या योग्य अंमलबजावणीसाठी जागरूकतेचा संदेश देत आहे. या घटनेने दाखवून दिले की धर्म आणि आध्यात्मिकतेच्या नावाखाली फसवणूक, शोषण व अत्याचार रोखण्यासाठी सखोल तपास आणि कठोर कायदेशीर कारवाई अत्यंत गरजेची आहे.

निष्कर्षतः, अशोक खरात प्रकरण हे फक्त व्यक्तिशः अपराध नाही; हे समाजाच्या मूल्यांवर, न्यायप्रणालीवर आणि धार्मिक विश्वासांच्या सुरक्षिततेवर एक मोठे आव्हान आहे. यातून स्पष्ट होते की अंधश्रद्धा, शोषण आणि बलात्काराविरुद्ध समाज, सरकार आणि न्यायव्यवस्थेला मिळून कार्य करणे अत्यंत आवश्यक आहे. जर यावर योग्य वेळी नियंत्रण न ठेवले, तर अशा प्रकारचे अत्याचार पुन्हा घडू शकतात, आणि समाजातील विश्वास व सुरक्षिततेला मोठा धक्का पोहोचतो.

या प्रकरणाने स्पष्ट केले की केवळ कायदा नाही तर सामाजिक जागरूकता, महिला सशक्तीकरण आणि धार्मिक संस्थांवरील पारदर्शकता या तीन गोष्टींचा एकत्रित प्रयत्न करूनच अशा घटना रोखता येतील. समाजाने आता ह्या प्रकरणातून धडा घेऊन आपले मूलभूत मूल्य आणि महिला सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे.

---

## ।। अभंगवाणी ।।



**समचरणदृष्टि विटेवरी साजिरी ।**
**तेथें माझी हरी वृत्ति राहो ॥१॥**
**आणीक न लगे मायिक पदार्थ ।**
**तेथें माझें आर्त नको देवा ॥ध्रु.॥**
**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ...तर काँग्रेस उमेदवार देणार!

## बारामती पोटनिवडणूक : विजय वडेट्टीवारांचं मोठं वक्तव्य!

**महाईन्यूज । मुंबई**

**अजित पवार यांच्या निधनाने रिक्त झालेल्या बारामती विधानसभेसाठी पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनाच राष्ट्रवादीकडून उमेदवारी दिली जाणार आहे. त्याविरोधात शरद पवारांची राष्ट्रवादी उमेदवार देणार नाही अशी भूमिका खासदार सुप्रिया सुळे यांनी जाहीर केली होती. त्यानंतर आता महाविकास आघाडीतील काँग्रेसच्या भूमिकेने सर्वात मोठा ट्विस्ट आला आहे. सुप्रिया सुळेंचे वक्तव्य आम्हाला मान्य नाही.**





'बारामती पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवार देणार नसेल तर काँग्रेस उमेदवारीबाबत विचार करेल, असं विजय वडेट्टीवार म्हणाले. सुप्रिया सुळे यांनी सुनेत्रा पवार यांच्याविरोधात उमेदवार देणार नसल्याचं बोलल्यानंतर वडेट्टीवार यांनी हे मोठे वक्तव्य केलं आहे. महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी या दोन विधानसभा मतदारसंघात येत्या 23 एप्रिलला मतदान आणि 4 मे रोजी निकाल होणार आहे.

विजय वडेट्टीवार नेमकं काय म्हणाले?

शरद पवार गटाची भूमिका आम्हाला मान्य नाही. जर तिकडे राष्ट्रवादी लढणार नसेल तर आम्ही तिकडे निवडणूक लढायचा विचार करू. पवार विरुद्ध पवार निवडणुका यापूर्वी झाल्या आहेत. ही जागा राष्ट्रवादी पक्षाकडे आहे. विलिनीकरण हा विषय होता तेव्हा काँग्रेसशी चर्चा केली नव्हती. आता निवडणुका होत आहेत. सुप्रिया सुळे म्हणाल्या सुनेत्रा वहिनीविरोधात कसा उमेदवार देणार. त्यांची भूमिका महाविकास आघाडी म्हणून मान्य नाही. जर राष्ट्रवादी लढणार नसेल तर काँग्रेसला तिथे उमेदवार देण्याबाबत विचार करावा लागेल, असं विजय वडेट्टीवार म्हणाले.

### ..तर बारामतीमध्ये होणार तिहेरी लढत

एकीकडे विजय वडेट्टीवारांनी बारामतीत काँग्रेसचा उमेदवार उतरवण्याचे संकेत दिले असताना, आधी बिनविरोध होण्याची चर्चा असणारी ही जागा आता तिरंगी लढतीने गाजण्याची चिन्हं आहेत. कारण याच मतदारसंघात ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके यांनीही शड्डू ठोकला आहे. बारामती विधानसभेची पोटनिवडणूक कोणत्याही परिस्थितीत लढवण्याचा निर्धार लक्ष्मण हाके यांनी बोलून दाखवला आहे.

### सुनेत्रा पवारांना विधान परिषदेवर घ्यावं : लक्ष्मण हाके

सुनेत्रा पवार यांना विधान परिषदेवर घ्यावं, इथं पवार सोडून विधानसभाला उमेदवार द्यावा असे मत लक्ष्मण हाके यांनी व्यक्त केले आहे. आम्ही निवडणूक लढवतो पण काही जणांच्या पोटात दुखते. आम्ही ही निवडणूक लढवतो आणि जिंकून दाखवतो असे हाके यांनी म्हटलं आहे. इथं अजित पवार यांच्या घरातील सोडून दुसरा उमेदवार उभा करा असेही हाके म्हणाले.

# राज्यात पावसाच्या नव्या अंदाजाने टेन्शन वाढलं!

**महाईन्यूज । मुंबई**

**राज्यातील काही भागात गारपीटीची शक्यता वर्तविण्यात आली आहे. दोन दिवस काही ठिकाणी गारपीट आणि बहुतांशी भागात पावसाचा अंदाज देण्यात आलेला आहे. पूर्व विदर्भ, दक्षिण मराठवाडा आणि दक्षिम मध्य महाराष्ट्रात पावसाचा जोर अधिक राहण्याची शक्यता आहे. काही जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्टही देण्यात आला आहे.**



राज्यात आज अनेक भागात पावसाला पोषक वातावरण आहे. तर कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, बीड, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात काही ठिकाणी विजा आणि ढगांच्या गडगडाटासह गारपीटीचा अंदाज देण्यात आला आहे.

यावेळी ५० ते ६० किलोमीटर प्रतितास वेगाने वारेही वाहतील, असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. तसेच आज सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, पुणे, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जालना, वाशीम, अमरावती, नागपूर, भंडारा आणि गोंदीया जिल्ह्यात काही ठिकाणी विजांसह पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

राज्यात उद्याही पाऊस आणि गारपीटीचा अंदाज आहे. उद्या अहिल्यानगर, बीड, जालना, परभणी, छत्रपतील संभाजीनगर, नाशिक आणि जळगाव जिल्ह्यात काही ठिकाणी विजा आणि मेघगर्जनेसह गारपीटीचा अंदाज आहे. यावेळी वादळी वारेही वाहतील, असाही अंदाज देण्यात आला आहे. तसेच विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्ये हलक्या पावसाचीही शक्यता वर्तविण्यात आली आहे.

शुक्रवारपासून राज्यात पावसाचे प्रमाण कमी होणार आहे. शुक्रवारी दक्षिण मराठवाडा आणि पूर्व विदर्भात काही ठिकाणी हलक्या पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. तर शनिवारपासून राज्यातील पावसाचे वातावरण निवळून पुन्हा तापमानात वाढीला सुरुवात होईल, असाही अंदाज हवामान विभागाने दिला आहे.

### काही जिल्ह्यांना हवामान खात्याचा यलो अलर्ट :

हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा इथं पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर राज्यातील अनेक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असल्यानं काही जिल्ह्याना यलो अलर्ट देण्यात आला आहे. तसंच पुढील 24 तासात कमाल तापमानात बदल होण्याची शक्यता आहे. पुढील तीन ते चार दिवस कमाल तापमान तीन ते चार अंश सेल्सिअसनं कमी होणार असल्याची शक्यता आहे.

### राज्यात 'या' ठिकाणी पाऊस होण्याची शक्यता :

हवामान विभागानं दिलेल्या अंदाजानुसार पुढील तीन ते चार दिवस गोवा, कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भ या विभागात मेघगर्जनेसह विजांचा कडकडाटासह आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे. त्यानंतर 20 मार्च ते 23 मार्च दरम्यान या चारही विभागात हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# इराणची आता 'आर या पार'ची तयारी!

## युद्ध अटळ: अमेरिकेला हादरवणारी धमकी, जगभरात चिंता वाढली

**महाईन्यूज | नवी दिल्ली**

**मध्यपूर्वेतील संघर्ष तीव्र होत असतानाच इराणने अप्रत्यक्षपणे एक मोठा संकेत दिला आहे. इस्रायलने इराणचे वरिष्ठ सुरक्षा अधिकारी अली लारिजानी ठार झाल्याचा दावा केल्यानंतर, इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास आराघची यांनी दिलेल्या प्रतिक्रियेत लारिजानींच्या मृत्यूला दुजोरा दिल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. मात्र, त्याचवेळी त्यांनी ठामपणे सांगितले की, "यामुळे इराणच्या सत्तासंरचनेवर कोणताही परिणाम होणार नाही".**

अल जजीराला दिलेल्या मुलाखतीत अब्बास आराघची म्हणाले, "इराणची व्यवस्था एखाद्या व्यक्तीवर अवलंबून नाही. एक व्यक्ती गेल्याने संपूर्ण सिस्टम कोसळत नाही." ते पुढे म्हणाले की, इराणची राजकीय, आर्थिक आणि सामाजिक संस्थात्मक रचना अत्यंत मजबूत आहे आणि ती कोणत्याही एकाच नेत्यावर आधारित नाही".

अमेरिका आणि इस्रायल अजूनही हे का समजून घेत नाहीत, हे मला कळत नाही," असा टोला त्यांनी लगावला.

इस्रायलचे संरक्षण मंत्री इस्राएल काटझ यांनी दावा केला होता की, अली लारिजणी यांचा



इस्रायली हल्ल्यात मृत्यू झाला. लारिजानी हे इराणच्या सुरक्षा धोरणाचे प्रमुख 'आर्किटेक्ट' मानले जात होते. सर्वोच्च नेते अली खामेनेई यांच्या मृत्यूनंतर ते इराणमधील सर्वात प्रभावशाली नेत्यांपैकी एक होते. मात्र, या दाव्यानंतर त्यांच्या सोशल मीडियावरून हस्तलिखित नोट पोस्ट झाल्याने सुरुवातीला संभ्रम निर्माण झाला होता. आता इराणकडून आलेल्या प्रतिक्रियेमुळे परिस्थिती अधिक स्पष्ट होत असल्याचे मानले जात आहे.

### खामेनेईनंतर लारिजानी 'की प्लेअर'

इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनेई यांच्या मृत्यूनंतर सत्तासंरचनेत मोठे बदल सुरू झाले होते. या संक्रमण काळात अली लारिजणी यांच्यावर 'रेजीम कंटिन्युइटी'ची महत्त्वाची जबाबदारी होती. अली लारिजणी यांच्या मृत्यूने इराणच्या नेतृत्वाला मोठा धक्का बसला असला, तरी अब्बास आराघची यांच्या प्रतिक्रियेतून एक स्पष्ट संदेश दिला गेला आहे. इराणची ताकद व्यक्तींमध्ये नाही, तर संस्थांमध्ये आहे. मात्र, हा आत्मविश्वास प्रत्यक्षात किती टिकतो आणि मध्यपूर्वेतील संघर्ष पुढे कोणत्या दिशेने जातो, याकडे आता संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.

### "सिस्टम व्यक्तीपेक्षा मोठी"इराणचा संदेश

अब्बास आराघची यांनी स्पष्ट केले की, "खामेनेई यांच्या मृत्यूनंतरही इराणची व्यवस्था कोसळली नाही, कारण ती संस्थांवर आधारित आहे." त्यांच्या या वक्तव्याचा स्पष्ट अर्थ असा आहे की, लारिजानींचा मृत्यू हा मोठा धक्का असला तरी इराणची धोरणे किंवा निर्णयप्रक्रिया बदलणार नाही. लारिजानी यांनी संघर्षाच्या सुरुवातीलाच अमेरिका आणि इस्रायलला कडक इशारा दिला होता. "अमेरिका आणि झायनिस्ट शासनाने इराणी राष्ट्राच्या हृदयाच्या धबक्या ला जाळून टाकले आहे. आम्ही त्यांच्या हृदयालाही जाळून टाकू."

# चीनकडे निघालेले रशियन तेलवाहू जहाज भारताकडे वळले!

**महाईन्यूज | नवी दिल्ली**

**चीनच्या दिशेने निघालेल्या रशियन तेलवाहू जहाजाने दक्षिण चीन समुद्रातून अचानक आपला मार्ग बदलला आहे. आता हे जहाज वेगाने भारताकडे येत आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धामुळे भारताने रशियाकडून कच्च्या तेलाची आयात वाढवण्याचा निर्णय घेतल्याच्या पार्श्वभूमीवर ही घडामोड मानली जात आहे.**

जहाज ट्रॅकिंग डेटानुसार, 'अ‍ॅफ्रामॅक्स टँकर अ‍ॅक्वा टायटन' रशियाचे 'युराल्स क्रूड' घेऊन २१ मार्च रोजी न्यू मंगलोर बंदरात पोहोचणे अपेक्षित आहे. या जहाजावर जानेवारीच्या अखेरीस बाल्टिक समुद्रातील बंदरातून तेल भरण्यात आले होते. येथून ते चीनच्या 'रिझाहो' बंदरात जाणार होते.मात्र आता आग्नेय आशियाई समुद्रात या जहाजाने अचानक आपला मार्ग बदलला आणि भारताच्या दिशेने प्रवास सुरू केला. दरम्यान, परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी पत्रकार परिषदेत या घडामोडीला अधिकृत दुजोरा दिलेला नाही.

इराणने इस्रायल आणि अमेरिकेसोबतच्या संघर्षामुळे 'होर्मुझची सामुद्रधुनी' (STRAIT OF HORMUZ) बंद केल्याने निर्माण झालेल्या ऊर्जा संकटाचा सामना करण्यासाठी अमेरिकेने भारताला रशियन कच्च्या तेलाची खरेदी वाढवण्याची मुभा दिली आहे. जगातील २० टक्क्यांहून अधिक तेल आणि द्रव नैसर्गिक वायूचा (LNG) पुरवठा याच सामुद्रधुनीतून होतो. या सवलतीनंतर, भारतीय रिफायनर्सनी वेगाने हालचाली



करत एका आठवड्यात सुमारे ३ कोटी बॅरल रशियन तेलाची खरेदी केली आहे. मध्यपूर्वेतील पारंपारिक पुरवठादारांकडून होणारी घट भरून काढण्यासाठी भारत प्रयत्नशील असल्याचे यावरून दिसून येते.

**'नाटो' देशांच्या भूमिकेवर ट्रम्प यांची टीका**

या हल्ल्याच्या काही तास आधी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'नाटो' मित्रदेशांवर आपली नाराजी व्यक्त केली होती. होर्मुझच्या सामुद्रधुनीत व्यापारी जहाजांच्या संरक्षणासाठी लष्करी मदत देण्याचे आवाहन ट्रम्प यांनी केले होते, जे बहुतेक मित्रदेशांनी फेटाळून लावले.

फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी स्पष्ट केले की, जोपर्यंत परिस्थिती निवळत नाही, तोपर्यंत फ्रान्स आपले नौदल तिथे पाठवणार नाही. यावर ट्रम्प यांनी 'नाटो'वर टीका करताना म्हटले, "नाटोची ही मोठी चूक आहे. आम्हाला कोणाच्याही मदतीची गरज नाही, आम्ही एकटे लढण्यास सक्षम आहोत."

### होर्मुझ सामुद्रधुनीजवळ अमेरिकेचा भीषण हल्ला

अमेरिकेने इराणच्या दक्षिण किनारपट्टीवरील 'होर्मुझची सामुद्रधुनी' परिसरातील क्षेपणास्त्र तळांना लक्ष्य करत मोठा हवाई हल्ला केला आहे. या हल्ल्यात अमेरिकेने २,२०० किलो वजनाच्या अत्यंत शक्तिशाली 'बंकर बस्टर' बॉम्बचा वर्षाव केला आहे. यूएस सेंट्रल कमांडने बुधवारी पहाटे दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकन सैन्याने इराणच्या किनारपट्टीवरील बळकट क्षेपणास्त्र तळांवर अनेक 'डीप पेनिट्रेटर' बॉम्ब डागले. इराणची ही जहाजाविरोधी क्रूझ क्षेपणास्त्रे आंतरराष्ट्रीय मालवाहू जहाजांसाठी मोठा धोका निर्माण करत होती, असा दावा अमेरिकेने केला आहे.

### इतर देशांनीही रशियाकडून सुरु केली तेल खरेदी

भारतासोबतच आता जपान आणि दक्षिण कोरिया यांसारख्या देशांनीही रशियाकडून तेल खरेदी पुन्हा सुरू केली आहे. यामुळे येणाऱ्या काळात कच्च्या तेलाच्या किमती वाढण्याची शक्यता आहे. 'वॉर्टेक्स लिमिटेड' या संस्थेच्या माहितीनुसार, आतापर्यंत किमान सात रशियन तेलवाहू जहाजांनी चीनकडे जाणारा आपला मार्ग बदलून भारताकडे वळवला आहे. भारतातील सर्व प्रमुख रिफायनर्स सध्या रशियन बाजारपेठेत सक्रिय झाले आहेत.

# नोराच्या 'सरके चुनर' गाण्याचा वाद



अभिनेत्री नोरा फतेही आणि संजय दत्त यांच्यावर चित्रित झालेले बॉलिवूड चित्रपटातील एक गाणे सध्या सांगलेच वादात सापडले आहे. या गाण्यावर सोशल मीडियातून चांगलीच टीका होत असून यावर बंदी घालण्याची मागणी देखील केली जात आहे. दरम्यान या गाण्याचा वाद थेट संसदेपर्यंत पोहचला आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बुधवारी या वादग्रस्त बॉलिवूड गाणे 'सरके चुनर' वर बंदी घालण्यात आली आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे समाज आणि संस्कृतीचा आदर करणाऱ्या उचित निर्बंधांच्या मर्यादितच असले पाहिजे असे वैष्णव यांनी यावेळी नमूद केले. या वादग्रस्त गाण्याबाबत लोकसभेत बोलताना अश्विनी वैष्णव म्हणाले की, "गाण्यावर आधीच बंदी घालण्यात आली आहे. मी स्पष्टपणे सांगू इच्छित आहे की, आपण अभिव्यक्ति स्वातंत्र्यामध्ये भारताच्या संविधान निर्मात्यांनी जे रास्त निर्बंध (REASONABLE RESTRICTIONS) लावले आहेत, त्यानुसारच चालले पाहिजे, अभिव्यक्ती स्वतंत्र्य हे अमर्याद असू शकत नाही, ते समाज आणि संस्कृतीच्या संदर्भातच असायला हवे." पुढे बोलताना वैष्णव म्हणाले की, "डिजिटल प्लॅटफॉर्मसच्या माध्यमातून ज्या पद्धतीने गोष्टी आज वेगाने पसरतात, त्यामध्ये समाजाच्या सुरक्षेसाठी विशेषत: मुले, महिला आणि समाजातील वंचित घटकांच्या सुरक्षिततेसाठी जी काही कठोर पावले उचलली पाहिजेत, ती उचलण्यासाठी सरकार पूर्णपणे वचनबद्ध आहे." हा मुद्दा समाजवादी पक्षाचे खासदार आनंद भदौरिया यांनी लोकसभेत उपस्थित केला होता. त्यांनी या वादग्रस्त गाण्याबाबत सरकारकडे स्पष्टीकरण मागितले होते. नोरा फतेही आणि संजय दत्त यांच्यावर चित्रित झालेले हे गाणे आगामी 'केडी: द डेव्हिल' या कन्नड चित्रपटातील आहे. हे गाणे ऑनलाइन प्रदर्शित झाल्याबरोबर या गाण्यामुळे मोठा वाद निर्माण झाला. सोशल मीडियावर अनेक वापरकर्त्यांनी गाण्यातील काही शब्द आणि दृश्यांवर आक्षेप नोंदवला होता. या गाण्याचे हिंदी व्हर्जन काही दिवसांपूर्वी यूट्यूबवर अपलोड करण्यात आले होते, पण याला सर्व स्तरातून होत असलेला विरोध पाहून हे दगाणे नंतर काढून टाकण्यात आले. मात्र कन्नड, मल्याळम, तेलगू आणि तमिळ भाषेतील हे गाणे अजूनही यूट्यूबवर उपलब्ध आहे. दरम्यान हा चित्रपट ३० एप्रिल रोजी प्रदर्शित होणार असून, तो अनेक भाषांमध्ये डब केला जाणार आहे.

# श्रद्धा कपूर लवकरच बोहल्यावर चढणार?



श्रद्धा कपूर राहुल मोदीला डेट करत आहे. दोघेही बऱ्याच काळापासून एकत्र आहेत. त्यामुळे आता श्रद्धा व तिचा बॉयफ्रेंड राहुल मोदी यांच्या लग्नाच्या चर्चा सुरू आहेत. दोघांनी किंवा त्यांच्या कुटुंबियांनी अद्याप यावर प्रतिक्रिया दिलेली नाही. पण श्रद्धाची मावशी तेजस्विनी कोल्हापुरेने भाचीच्या लग्नाच्या चर्चांवर मौन सोडलं आहे. तेजस्विनी कोल्हापुरे ही एक यशस्वी 'रॅम्प मॉडेल' आहे. तिने अनेक नामवंत डिझाइनर्ससाठी २०० पेक्षा जास्त फॅशन शो केले आहेत. तिने 'मुझे चाँद चाहिए' या टीव्ही मालिकेत काम केलं होतं. तसेच अनुराग कश्यप यांच्या बहुचर्चित 'अग्ली' (UGLY) या चित्रपटात महत्त्वाची भूमिका साकारली होती. त्याचबरोबर तिने पाच, रावण, हॅप्पी फिर भाग जायेगी या चित्रपटांमध्ये काम केलं आहे. 'द फ्री प्रेस जर्नल'ला दिलेल्या एका मुलाखतीत तेजस्विनी कोल्हापुरेला श्रद्धा कपूरच्या लग्नाबद्दल सुरू असलेल्या चर्चांबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यावर तेजस्विनी हसत म्हणाली, "खरंच? मला याबद्दल काहीच माहित नाही. मला याची काहीच कल्पनाही नाही."

# सनातनी असल्याचं सिद्ध करा



बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री सारा अली खान ही भोलेनाथांची भक्त आहे. आपल्या बिजी शेड्युलमधून ती हमखास वेळ काढून केदारनाथला भेट देत असते. सोशल मीडियावर ती या आपल्या भक्तीमय ट्रीपचे फोटो शेअर करत असते. मात्र आता सारा अली खानला केदारनाथांचे दर्शन घेण्यावर बंधने येऊ शकतात. बद्रीनाथ - केदारनाथ मंदिर कमिटीचे अध्यक्ष हेमंत द्विवेदी यांनी अभिनेत्री सारा अली खान जेव्हा सनातन धर्मावर त्यांची श्रद्धा आहे असं प्रमाणपत्र देतील तेव्हाच त्या केदारनाथला भेट देऊ शकतात असं सांगितलं. द्विवेदी यांनी हे वक्तव्य देहराडून येथील पत्रकार परिषदेत केलं.

# केकेआर चे जेतेपदाचे स्वप्न भंगणार?

## आयपीएल २०२६ स्पर्धेचं आगामी हंगाम सुरू होण्यापूर्वी फाफ डू प्लेसिसने दिला धोक्याचा इशारा

**महाईन्यूज । मुंबई**



**कोलकाता नाईट रायडर्सचा संघ आगामी हंगामातही अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखाली खेळताना दिसून येणार आहे. कोलकाता नाईट रायडर्सने आतापर्यंत ३ वेळा जेतेपदाची ट्रॉफी उंचावली आहे. त्यामुळे यावेळी हा संघ चौथ्यांदा जेतेपदाची ट्रॉफी उंचावण्याच्या प्रयत्नात असणार आहे. गेल्या हंगामापेक्षा या हंगामात कोलकाता नाईट रायडर्सचा संघ आणखी मजबूत असल्याचं दिसून येत आहे.**

त्यामुळे या संघाला जेतेपदासाठी प्रबळ दावेदार मानलं जात आहे. पण चेन्नई सुपर किंग्ज संघातील माजी खेळाडू फाफ डू प्लेसिसने कोलकाता नाईट रायडर्स संघाची कमकुवत बाजू सांगितली आहे.

आयपीएल २०२६ स्पर्धेसाठी झालेल्या मिनी ऑक्शनमध्ये कोलकाता नाईट रायडर्स संघाने आपला संघ संतुलित करण्याचा पूर्ण प्रयत्न केला. पण तरीदेखील फाफ डू प्लेसिसने कोलकाता नाईट रायडर्स संघावर प्रश्न उपस्थित केले आहेत. डू प्लेसिस म्हणाला, "कोलकाताच्या गोलंदाजी आक्रमणावर प्रश्नचिन्ह आहे. त्यांचे गोलंदाज दुखापतग्रस्त आहेत. त्यामुळे त्यांना त्यांच्या सर्वात अनुभवी खेळाडूला मैदानात उतरावावं लागणार आहे. त्यांच्याकडे जगातील २ उत्तम फिरकी गोलंदाज आहेत, जे त्यांना चॅम्पियन बनवू शकतात. वरूण आणि नरेनला दमदार गोलंदाजी करावी लागणार आहे."

संघाची गोलंदाजी ही कोलकाता नाईट रायडर्स संघासाठी चिंता वाढवणारी बाब आहे. कारण टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील पहिल्या सामन्याआधीच हर्षित राणा दुखापतग्रस्त झाला होता. पण तो अजूनही पूर्णपणे फिट होऊ शकलेला नाही. त्यामुळे हर्षित राणा स्पर्धेतून बाहेर पडण्याच्या वाटेवर आहे. तर मथीशा पथिराना देखील स्पर्धेबाहेर होऊ शकतो. बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिजूर रहमान आयपीएलमध्ये खेळणार नाही, हे तर निश्चित आहे. त्यामुळे वैभव अरोरावर मोठी जबाबदारी असणार आहे.

गेल्या हंगामात कोलकाता नाईट रायडर्स संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी अजिंक्य रहाणेकडे सोपवण्यात आली होती. यावेळीही संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी रहाणेकडे असणार आहे. गेल्या हंगामात हा संघ गुणतालिकेत ८ व्या स्थानी होता. यावेळी कोलकाताने मिनी ऑक्शनमध्ये स्टार खेळाडूंवर बोली लावली आहे. त्यामुळे यावेळी कोलकाताकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा असणार आहे. तसेच युवा आणि अनुभवी खेळाडूंच्या संतुलनामुळे कोलकाताकडून यंदा अधिक आक्रमक आणि सातत्यपूर्ण खेळ पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

# रोहित शर्मा फक्त बॅटिंगच करणार? याआधी जे झालं ते विसरा!

**महाईन्यूज । मुंबई**

**इंडियन प्रीमियर लीगच्या १९ व्या हंगामाची क्रिकेट चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता दिसून येत आहे. २८ मार्चला IPL स्पर्धेचा बिगूल वाजणार असून दुसऱ्या दिवशीच या स्पर्धेतील सर्वात यशस्वी आणि लोकप्रिय मुंबई इंडियन्स संघ मैदानात उतरेल. २९ मार्चला KKR विरुद्ध मुंबईतील वानखेडेच्या घरच्या मैदानातून MI संघ यंदाच्या हंगामातील मोहिमेची सुरुवात करेल.**





यंदाच्या हंगामात रोहित शर्माची भूमिका काय असेल? तो फक्त फलंदाजीच करणार का? अर्थात त्याचा वापर इम्पॅक्ट प्लेयरच्या रुपातच करण्यात येणार का? हा मुद्दा चांगलाच चर्चेचा विषय ठरत आहे. यासंदर्भात मुंबई इंडियन्सचे मुख्य प्रशिक्षक महिला जयवर्धने यांनी संघ व्यवस्थापनाची भूमिका एकदम स्पष्टपणे सांगितली आहे.

एमआय ज्युनियर २०२६ च्या अंतिम सामन्यादरम्यान रोहितबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना जयवर्धने म्हणाले की, रोहितने स्वतःची फिटनेस उत्तम पद्धतीने सांभाळली आहे. तो आता पूर्वीपेक्षा अधिक तंदुरुस्त दिसतोय. गेल्या आठवड्यात रोहित शर्मा संघाला जॉईन झाला असून तो नेट्समध्ये उत्तमरित्या फटकेबाजी करत आहे. आयपीएल २०२६ च्या हंगामात त्याचा वापर योग्य पद्धतीने करणे गरजेचे आहे. त्याचा अजूनही कायम आहे. त्यामुळे रोहित शर्मा इम्पॅक्ट प्लेयरच्या रुपात नव्हे तर शक्य तितका वेळ मैदानावर ठेवण्याचा आमचा प्रयत्न असेल, असा गेम प्लॅनचा जयवर्धने यांनी सांगून टाकला. मागील हंगामात रोहित शर्मा हा बऱ्याच सामन्यात इम्पॅक्ट प्लेयरच्या रुपात खेळताना दिसला होता. यासंदर्भात MI कोच म्हणाले की, दुखापतीमुळे त्याचा जपून वापर केला होता. मात्र यावेळी तशी परिस्थिती नाही, असेही जयवर्धने यांनी सांगितले. इम्पॅक्ट प्लेयर म्हणून एखादा गोलंदाज आणायचा निर्णय घेतल्यास कोणत्या खेळाडूला बाहेर ठेवायचे, याचा नीट विचार करावा लागतो. संघात बहुतेक खेळाडू अष्टपैलू असल्याने सध्या केवळ रोहित शर्मा आणि सूर्यकुमार यादव हेच पूर्णवेळ फलंदाज आहेत, हे देखील त्यांनी सांगितले.

सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने टी-२० वर्ल्ड कप स्पर्धा जिंकली. पण त्याची फलंदाजी ही चिंतेचा विषय आहे. यासंदर्भातही जयवर्धने म्हणाले की, त्यांच्या फॉर्मबाबत आम्ही फार चिंतित नाही. ते दर्जेदार खेळाडू आहे आणि गरजेच्या वेळी तो संघाच्या मदतीला धावून येतो. सातत्य महत्त्वाचे आहे आणि त्यावर सूर्या नक्कीच काम करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। गुरुवार ।
दि. 19 मार्च 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## बलिदानदिनी छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन

# ‘स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण’ समोर राष्ट्रवादी व शिवसेनेचे नगरसेवक ‘नतमस्तक’

महाईन्यूज ।
पिंपरी-चिंचवड

**फाल्गुन अमावस्या किंवा मृत्युंजय अमावस्या अर्थात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा “बलिदान दिन” च्या निमित्त पिंपरी-चिंचवडमधील राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक “स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण” समोर नतमस्तक झाले. वास्तविक, सातत्याने या पवित्र कार्यावर आक्षेप नोंदवणारे हे सन्माननीय आजतरी “आत्मक्लेश” करतील का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.**





पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाच्या माध्यमातून आणि भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून बोऱ्हाडेवाडी-मोशी येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा जगातील सर्वांत उंच पुतळा अर्थात “स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण” उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे. या पुतळ्यामुळे पिंपरी-चिंचवड शहराची नवी ओळख महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आणि देश-विदेशातही निर्माण होवू लागली आहे. शिव-शंभूप्रेमी आणि हिंदुत्ववादी तरुणांमध्ये “शंभूसृष्टी” बाबत कमालीची ‘क्रेझ’ आहे. सोशल मीडियावर



हजारो इन्फ्ल्यूएन्सर व्यक्त होताना दिसतात.

दरम्यान, ‘‘स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण” च्या स्थापत्य आणि विद्युत विषयक कामाचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर होता. त्यापैकी स्थापत्य विभागाचा प्रस्ताव AT PAR दराने मंजूर करण्याबाबत शिवसेना शिंदे गटाच्या स्थायी समिती सदस्या सुलभा उबाळे यांनी आक्षेप नोंदवला. त्यानंतर सर्वसाधारण सभेतही आगपाखड केली होती. सुरूवातील हा विषय तहकूब ठेवण्यात आला. त्यानंतर स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी या विषयाला मंजुरी दिली. त्यामुळे उबाळे आणि टीमच्या विरोधाची हवा काढून घेतली होती.

छत्रपतींच्या पुतळ्याच्या कार्यात राजकीय उद्देशाने केलेली टीका-टीपण्णी आणि चमकोगिरीवर शिव-शंभू विचारांच्या कार्यकर्त्यांमध्ये संताप व्यक्त होवू लागला. शिवसेनेचे नाव सांगायचे अन् शिव-शंभू विचाराच्या कार्याला राजकीय फायद्यासाठी विरोध करायचा.. त्याचा “ड्रामा” करणे योग्य आहे का? असा प्रश्न सोशल मीडियावर अनेकांनी उपस्थित केला. त्यामुळे हादरलेल्या सुलभा उबाळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसमधील काही नगरसेवकांनी बलिदान दिनाच्या निमित्त “स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण” समोर नतमस्तक होण्याचा निर्णय घेतला असावा, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

### महानगरपालिका भवनाच्या पायऱ्यांवर पुन्हा “ड्रामा”

छत्रपती संभाजी महाराज पुतळ्यावरुन पुन्हा एकदा सुलभा उबाळे आणि टीमने महापालिका भवनाच्या पायऱ्यांवर बसून आंदोलन करीत “ड्रामेबाजी” केली. प्रसारमाध्यमांसमोर “धनेश्वर काय महापालिकेचा जावई आहे का? ” असा प्रश्न उपस्थित केला. त्यानंतर हिंदूभूषण स्मारक ट्रस्ट ही अराजकीय व अशासकीय संस्था स्थापन केल्याबद्दल त्यावरही आक्षेप नोंदवला. केवळ आक्षेप नोंदवला नाही, तर या संस्थेवर सर्वपक्षीय गटनेत्यांची नियुक्ती करावी, अशी आश्चर्यजनक मागणी केली. याचा अर्थ असा होतो की, संबंधित ट्रस्ट स्थापन केले, याला उबाळे यांचा विरोध नाही, तर त्यामध्ये सर्वपक्षीय गटनेते, विरोधी पक्षनेते, महापौर यांना का घेतले नाही? अशी सल आहे. विशेष म्हणजे, धनेश्वर नावाचा ठेकेदार महापालिकेचा जावई आहे का? असा प्रश्न उपस्थित करणाऱ्या सुलभा उबाळे भारतीय जनता पार्टीचा निषेध करतात. त्याच उबाळे ‘स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण’ समोर भाजपाचे निष्ठावंत नेते आणि माजी खासदार अमर साबळे यांच्यासोबत छायाचित्र फोटो काढण्यासाठी उभा राहातात, हा परस्पर विरोधाभास आहे. त्यामुळे पुतळ्याच्या कामाला नव्हे, तर पुतळ्याच्या आडून भाजपाला विरोध आहे. कारण, उबाळे यांना आगामी विधानसभा निवडणूक लढवायची आहे, असे स्पष्ट होते, अशी वस्तुनिष्ठ टीपण्णीही राजकीय निरीक्षकांनी नोंदवली आहे.

# भीषण अपघातात तीन तरूणांचा मृत्यू

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

फिरण्यासाठी गेलेल्या पिंपरी-चिंचवड शहरातील तरुणांच्या एका मोटारीला राजस्थानमधील कोटा शहरात अपघात झाला असून त्यात तिघांचा मृत्यू झाला आहे. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या मतदारसंघात ही घटना घडली आहे. त्यांच्या सचिवाशी माझी चर्चा झाली आहे. तिघांच्या मृतदेहाचे पोस्ट मार्टम झाले असून नातेवाईक तिथे पोहोचले आहेत. गुरुवारी सकाळी मृतदेह शहरात आणण्यात येणार आहेत, अशी माहिती खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली.

पिंपरी-चिंचवड शहरातील 14 तरुणांचा ग्रुप मोटारीने फिरण्यासाठी परराज्यात गेला आहे. या तरुणांच्या एका मोटारीचा राजस्थानमधील कोटा शहरात बुधवारी पहाटे अपघात झाला. त्यात तिघांचा झोपतेच मृत्यू झाला आहे. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या सचिवाने मला संपर्क साधून या अपघाताची माहिती दिली. माझी त्यांच्याशी सविस्तर चर्चा झाली. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. संपूर्ण मदत करण्यात आली आहे. तिघांच्या मृतदेहाचे पोस्ट मार्टम झाले असून नातेवाईक तिथे पोहोचले आहेत. मृतदेह आणण्यासाठी इअर ॲम्बुलन्स उपलब्ध झाली आहे. पण, 300 किलोमीटरचे अंतर आहे. त्यामुळे मृतदेह विमानाने की ॲम्बुलन्सने आणायचे याबाबत कुटुंबातील सदस्यांशी चर्चा सुरू आहे, असे खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले.

लेह-लडाखच्यामध्ये कारगिल येथे हे पर्यटक आठ दिवसांपूर्वी अडकले होते. बर्फवृष्टी झाल्याने रस्ते बंद होते. त्यामुळे पाच दिवस ते एकाच ठिकाणी अडकले होते. त्यांना कोठेही जाता येत नव्हते. त्यावेळीही त्यांचा फोन आला होता. बीएसएफच्या कमांडरशी संवाद साधून या पर्यटकांना तेथून सोडले होते, असेही खासदार बारणे यांनी सांगितले.



# ‘उच्च शिक्षण आणि शाश्वत विकास' परिसंवाद

## शिक्षण विश्व : डॉ. गीता शिंदे आणि डॉ. चित्रा सोहनी यांचे मार्गदर्शन

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**“उच्च शिक्षण आणि शाश्वत विकास” या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय परिसंवाद SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY यांच्या सहकार्याने गुणवत्ता सुधारणा कार्यक्रमांतर्गत कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चिंचवड येथे उत्साहात पार पडला.**



परिसंवादाचे उद्घाटन एसपीपीयूच्या विभागप्रमुख व वक्त्या डॉ. गीता शिंदे आणि प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ डॉ. चित्रा सोहनी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पूर्णिमा कदम यांनी मान्यवरांचा पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार केला.

समारोप समारंभात प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सहभागी संशोधक व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. परिसंवादाचे प्रास्ताविक व आभार समन्वयिका प्रा. अस्मिता यादव यांनी मानले. या परिसंवादामुळे शिक्षक, संशोधक आणि विद्यार्थ्यांना शाश्वत विकासाच्या विविध पैलूंवर विचारमंथनाची संधी मिळाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे सचिव डॉ. दीपक शहा, प्राचार्या डॉ. पूर्णिमा कदम तसेच सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले. एकूणच हा परिसंवाद यशस्वीरीत्या पार पडला.

### गुणवत्तापूर्ण शिक्षण – एक शाश्वत ध्येय

उद्घाटन सत्रात मान्यवरांनी उच्च शिक्षणात शाश्वत विकासाची गरज अधोरेखित करत, शिक्षण प्रणालीमध्ये त्याचा समावेश कसा करता येईल याबाबत मार्गदर्शन केले. अध्यापन पद्धतींमधून शाश्वत मूल्यांचा प्रसार करण्यावरही सविस्तर चर्चा झाली. दुपारच्या सत्रात पी. ए. इनामदार विद्यापीठाच्या अधिष्ठाता डॉ. अनिता बेलापूरकर यांनी “शाश्वत विकासासाठी समावेशकता” या विषयावर मार्गदर्शन करत सर्वसमावेशक शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले. “गुणवत्तापूर्ण शिक्षण – एक शाश्वत ध्येय” या सत्रात डॉ. अर्चना चौधरी यांनी दर्जेदार शिक्षण हे शाश्वत विकासाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे सांगितले.

# “भावनिक बुद्धिमत्ता” विषयावर राष्ट्रीय परिषद

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रायोजित “भावनिक बुद्धिमत्ता” या विषयावर आधारित दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद डॉ. डी. वाय. पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय येथे उत्साहात संपन्न झाली. परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी नांदेड येथील प्रसिद्ध मानसोपचारतज्ञ व समुपदेशक डॉ. नंदू मुलमुले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात भावनिक बुद्धिमत्तेचे वैयक्तिक, सामाजिक तसेच व्यावसायिक जीवनातील महत्त्व अधोरेखित केले.**

### पोस्टर सादरीकरण स्पर्धा

परिषदेच्या निमित्ताने पोस्टर सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेतील विजेत्यांना समारोप सोहळ्यात डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सध्याच्या काळात अत्यंत महत्त्वाच्या विषयावर परिषद आयोजित केल्याबद्दल डॉ. प्रमोद पाटील यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. निरज व्यवहारे यांचे विशेष कौतुक केले.

या परिषदेत डॉ. सुमिता सातारकर, डॉ. नीता गाडे, डॉ. उन्नती कोळी, डॉ. प्राजक्ता कुलकर्णी, डॉ. तन्वी नाईक, डॉ. नीकिता भगवानी, डॉ. गीता होनराव, श्रुती सेठ आणि डॉ. मिनल सोहनी आदी तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. त्यांनी भावनिक बुद्धिमत्तेचे दैनंदिन जीवनातील महत्त्व, व्यावसायिक क्षेत्रातील उपयोग तसेच तणावपूर्ण परिस्थितीत भावनिक संतुलन कसे राखावे याविषयी सखोल माहिती दिली.

परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी समन्वयक डॉ. शिल्पा चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. सारिका निकम व डॉ. प्रियतमा पोवार यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी प्रतिनिधी श्रीकांत नाईक व श्रेयशी देशमुख यांनी केले. ही परिषद यशस्वीपणे पार पडल्याबद्दल संकुल संचालक रियर ॲडमिरल अमित विक्रम (नि) व विश्वस्त तेजस पाटील यांनी सर्व आयोजक व सहभागींचे अभिनंदन केले.



# आयुक्तांनी केली प्रशासकीय विभागाची प्रत्यक्ष पाहणी

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नवनियुक्त आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आज पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील विविध विभागांना भेट देत कामकाजाची सखोल पाहणी केली.**

या पाहणीदरम्यान प्रशासन अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्याच्या दृष्टीने त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना विविध सूचना दिल्या.

या पाहणी दरम्यान त्यांचे समवेत उप संचालक किशोर गोखले, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह शहर अभियंता सुनील भागवानी, बापू गायकवाड, अनिल भालसाखळे, उप आयुक्त राजेश आगळे, सचिन पवार, चेतना केरुरे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह विविध विभागांचे विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पाहणीदरम्यान आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी प्रत्येक विभागातील दैनंदिन कामकाज, प्रलंबित विषय, नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारी व त्यावर करण्यात येणारी कार्यवाही याबाबत सविस्तर माहिती घेतली. तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांशी थेट संवाद साधत कामातील अडचणी, आवश्यक मनुष्यबळ, तांत्रिक सुविधा यांचा आढावा घेतला. प्रशासनातील कामकाज अधिक सुटसुटीत आणि गतिमान करण्यासाठी विभागीय पातळीवर समन्वय वाढविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.


यावेळी त्यांनी विभागांची अंतर्गत रचना, बैठक व्यवस्था आणि कार्यालयीन परिसराची स्वच्छता यावर विशेष भर दिला. कार्यालयीन जागा अधिक सुव्यवस्थित, स्वच्छ आणि कामकाजास पूरक राहील, यासाठी जुन्या फाईल्स व अनावश्यक कागदपत्रांचे गठ्ठे तत्काळ हटविण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

# पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासन ‘स्वस्तिक इंडिया’ कंपनीवर मेहरबान?

## स्वच्छ भारत जनजागृतीच्या नावाखाली 40 लाखांची उधळपट्टी!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेतील “स्वच्छ भारत जनजागृती” मोहिमेच्या नावाखाली तब्बल ४० लाख रुपयांच्या खर्चाच्या प्रस्तावावर तीव्र आक्षेप घेतले जात आहेत. स्थायी समितीमध्ये प्रस्तावित विषय क्रमांक १२ तहकूब करावा, अशी मागणी केली जात आहे. विशेष म्हणजे, या कामातील पारदर्शकतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.**




महापालिका प्रशासनाने रेडिओ जनजागृतीसाठी सुमारे ३२.४६ लाख रुपये खर्च प्रस्तावित केला असून, त्यावर १८% GST मिळून एकूण खर्च जवळपास ३८.३९ ते ४० लाख रुपयांपर्यंत पोहोचत आहे. मात्र, हा खर्च अत्यंत अवाजवी असल्याची टीका होत आहे. करदात्यांच्या पैशाचा काटेकोर वापर अपेक्षित असताना इतका मोठा निधी केवळ जाहिरातींसाठी खर्च करणे आर्थिक शिस्तीच्या विरोधात आहे.

विशेष म्हणजे, डिजिटल युगात सोशल मीडिया, मोबाईल ॲप, LED व्हॅन, पोस्टर्स, प्रभागनिहाय सभा, शाळा-महाविद्यालयांमधील उपक्रम, तसेच कचरा संकलन कर्मचाऱ्यांमार्फत थेट संवाद यांसारखी अनेक कमी खर्चिक आणि प्रभावी माध्यमे उपलब्ध असताना रेडिओवर एवढा खर्च करण्याचे औचित्य काय, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

पथनाट्य, माहिती फलक, स्थानिक उपक्रम यांसारख्या उपाययोजना अधिक परिणामकारक ठरू शकतात. याचा विचार प्रशासनाने केलेला नाही. दरम्यान, शहरात आधीपासूनच कचरा वर्गीकरण, घराघरातून कचरा संकलन, दंडात्मक कारवाई यांसारखे उपक्रम सुरू असताना नवीन खर्च करण्याऐवजी विद्यमान यंत्रणा अधिक सक्षम करण्याची गरज असल्याचेही मत पुढे येत आहे. स्वच्छ सर्वेक्षणात शहराने चांगली कामगिरी केली असली तरी प्रत्यक्षात अनेक ठिकाणी कचरा उघड्यावर पडलेला दिसतो, वेळेवर उचल होत नाही, अशा समस्या कायम आहेत. त्यामुळे केवळ जाहिरातींवर खर्च करण्यापेक्षा प्रत्यक्ष स्वच्छतेवर भर देणे अधिक गरजेचे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर, “स्वच्छता महत्त्वाची असली तरी जनजागृतीच्या नावाखाली अनावश्यक खर्च करणे योग्य नाही. कमी खर्चात अधिक परिणामकारक उपाययोजना राबविणे हेच शहराच्या हिताचे आहे,” अशी ठाम भूमिका घेत स्थायी समितीच्या अजेंड्यावरील विषय क्रमांक १२ रद्द करण्याची मागणी करण्यात येत आहे. एकूणच, “स्वच्छ भारत” मोहिमेच्या नावाखाली होणाऱ्या या खर्चावरून महापालिका प्रशासन ‘स्वस्तिक इंडिया’वर मेहरबान असल्याची चर्चा रंगू लागली असून, यावर स्थायी समिती सभा काय भूमिका घेते? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### ठेकेदाराचा दावा खोटा?

याशिवाय, पिंपरी-चिंचवड शहरात रेडिओ श्रोत्यांची नेमकी संख्या, त्यांचा प्रतिसाद किंवा जनजागृतीचा मोजता येणारा परिणाम याबाबत कोणताही अधिकृत डेटा सादर करण्यात आलेला नाही. “मोठ्या प्रमाणावर श्रोते आहेत” हा दावा ठेकेदार कंपनीकडून करण्यात आला असला तरी त्याला ठोस पुरावा नसल्याची बाबही समोर येत आहे. निविदा प्रक्रियेबाबतही गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. प्रशासनाकडून केवळ ‘स्वस्तिक इंडिया’ या एकाच कंपनीचा प्रस्ताव विचारात घेण्यात आल्याचे दिसून येते. खुली निविदा प्रक्रिया किंवा स्पर्धात्मक दर मागविण्यात आले नसल्याने पारदर्शकतेचा अभाव असल्याची टीका होत आहे.

# लोणावळा धरणात स्टंटबाजीचा त्रास...

**महाईन्यूज । लोणावळा**



सह्याद्रीच्या कुशीत वसलेले आणि पर्यटकांचे आवडते केंद्र असलेल्या लोणावळा शहराच्या सौंदर्यात भर घालणारे लोणावळा धरण सध्या एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आले आहे. धरणातील पाणी आटल्याने उघड्या पडलेल्या कोरड्या पात्रात काही हुल्लडबाज वाहनचालकांनी स्टंटबाजी सुरू केली असून, यामुळे ज्येष्ठ नागरिक आणि सराव करणाऱ्या खेळाडूंना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

लोणावळा धरणाचा परिसर अत्यंत विहंगम आणि निसर्गरम्य आहे. नोव्हेंबर ते मे महिन्यापर्यंत या ठिकाणी सकाळ-संध्याकाळ अल्हाददायक गारवा असतो. याच वातावरणामुळे लोणावळा शहरातील नागरिक तसेच भुशी गाव, रामनगर आणि परिसरातील शेकडो नागरिक येथे फेरफटका मारण्यासाठी येतात. अनेक ज्येष्ठ नागरिक झाडांच्या सावलीत विश्रांती घेतात, तर स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे तरुण येथे धावण्याचा सराव करतात. शांत वातावरणात अभ्यास करतात. इतकेच नव्हे, तर महिला आणि लहान मुले सुरक्षित जागा म्हणून येथे सायकलिंग किंवा वाहनचालवायला शिकण्यासाठी येतात. मात्र, गेल्या काही दिवसांपासून काही तरुण आपल्या दुचाकी आणि चारचाकी वाहने थेट धरणाच्या पात्रात उतरवून अतिवेगाने चालवत स्टंटबाजी करत आहेत. जागेवर गाड्या फिरवत धूळ उडवतात, या स्टंटबाजीमुळे परिसरात धुळीचे प्रचंड लोट तयार होत आहेत. ही धूळ थेट वस्तीत आणि रस्त्यावरून जाणाऱ्या प्रवाशांच्या नाका-तोंडात जात असल्याने आरोग्याचे प्रश्न निर्माण होत आहेत.

# लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त विशेष कार्यक्रम

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरीतील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयात लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीच्या सदस्य मा. प्रा. डॉ. जयश्री मगदूम या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.**



महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो .डॉक्टर पांडुरंग भोसले यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जयश्री मगदूम यांनी लक्ष्मीबाई पाटील यांच्या कार्याचा गौरव केला. लक्ष्मीबाई पाटील यांचा जीवनपट उलगडून दाखवताना मगदूम यांनी लक्ष्मीबाई पाटील यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांना दिलेल्या खंबीर साथीची माहिती दिली. यावेळी बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रो.पांडुरंग भोसले यांनी लक्ष्मीबाई पाटील यांच्या त्यागाची माहिती दिली.

लक्ष्मीबाई पाटील यांनी संपूर्ण आयुष्य आयुष्य विद्यार्थ्यांच्या हितासाठी घालवण्याचे स्पष्ट केले. या कार्यक्रमाला विज्ञान शाखेच्या उपप्राचार्य प्रो. डॉ. संगीता अहिवळे, कला शाखेच्या उपप्राचार्य प्रो.डॉ. कामयानी सुर्वे, वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य प्रो.डॉ. सुहास निंबाळकर, बी. व्होक मास कम्युनिकेशनचे नोडल अधिकारी डॉ. दत्तात्रय हिंगणे, प्रा. स्वप्ना हजारे, डॉ. शुभदा लोंढे, डॉ.निळकंठ डहाळे उपस्थित होते. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# Why Sports Matter More Than Ever!



In an era dominated by screens, the school sports field remains one of the most vital classrooms. While textbooks teach us facts, sports teach us how to live.

The most obvious benefit is physical health, but the real magic happens mentally. Being part of a team builds resilience. Learning to lose gracefully and win humbly are lessons that stay with a student long after graduation. It forces us to communicate under pressure and trust our peers.

Furthermore, sports are a powerful stress-buster. The endorphins released during a game provide a necessary break from exam pressure. It's not just about the final score; it's about the discipline of showing up and the bond formed with teammates.

As we look toward the future, we must remember that a healthy mind needs a healthy body. Whether it's football, swimming, or track, staying active is the key to a balanced student life.

By
JIGISHA A.KHAIRNAR
GRADE (IX)
Priyadarshani School,
Moshi

